# ब्रॉयलर पक्ष्यांच्या योग्य वाढीसाठी व्यवस्थापन



प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर**
**संशोधन अनुदान अंतर्गत**

ब्रॉयलर पक्ष्यांमध्ये वाढीचे प्रमाण चांगले असते. परंतु वातावरणातील अनेक घटक जसे – तापमान, आर्द्रता, वायू नियोजन, हवा, प्रकाश इ. मांसल पक्ष्यांच्या वाढीवर विपरीत परिणाम करतात. यापासून पक्ष्यांचे संरक्षण केल्यास निश्चितच त्यांची वाढ चांगली होते, तसेच पक्ष्यांच्या मृत्यूचे प्रमाणदेखील कमी होते. यासाठी व्यवस्थापनात थोडासा बदल केल्यास फायदा होतो. शेडमध्ये पक्ष्यांसाठी खाद्य व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था असावी.

पक्षी शेडमध्ये आणल्यानंतर पहिल्या दोन आठवड्यांत योग्य ती काळजी गरजेचे असते. अंडी उबवणूक केंद्रामधून पिल्ले शेडवर येण्यापूर्वी पिल्ले ठेवायची जागा स्वच्छ व निर्जंतुक करणे आवश्यक आहे. कारण पिल्ले वाढवण्याच्या जागेवर जंतूंचे प्रमाण वाढल्यास पिल्लांची योग्य वाढ होत नाही आणि पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाणदेखील वाढते. प्रथम पिल्लांचे शेड स्वच्छ धुऊन निर्जंतुकीकरण करावे. निर्जंतुकीकरण केलेले शेड कमीत कमी तीन ते चार आठवडे रिकामे ठेवावे. वायू निर्जंतुकीकरण जंतूंचा नाश करण्यासाठी चांगले आहे.

कृत्रिम अंडी उबवणूक यंत्रामध्ये साधारणतः १०१ अंश फॅ. तापमान असते. वातावरणातील तापमान



साधारणतः ७० अंश ते ८० अंश फॅ. असते. अंडी उबवणूक केंद्रामधून शेडवर पिल्ले आणली जातात, तेव्हा २५ अंश ते ३० अंश फॅ. तापमानाचा फरक असतो. शेडमधील कमी तापमानामुळे पिल्लांना थंडी वाजते व पिल्लांवर ताण येतो, त्यामुळे पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाण वाढते; तसेच पिल्लांची हालचाल कमी होते. पर्यायाने नियोजित वाढ होऊ शकत नाही. अंडी उबवणूक केंद्रामधून आल्यानंतर पिल्लांना कृत्रिम ऊब देणे आवश्यक आहे. पिल्लांमध्ये वातावरणातील घटकांशी समतोल व नियंत्रण करण्यासाठी लागणारी यंत्रणा पूर्णपणे विकसित नसते, त्यासाठी कृत्रिम उष्णता स्रोतांचा उपयोग करावा लागतो. यामध्ये विशेषतः विद्युतवर चालणारी





ब्रूडर्स, गॅसवर चालणारी जाणारी ब्रूडर्स, कोळशाची शेगडी इ. चा वापर करता येतो. विद्युत ब्रूडर्स वापरताना प्रति पिल्लास हालचाल २.५ वॉट विद्युत आवश्यक आहे. विद्युतवर चालणारी किंवा गॅसवर चालणारी ब्रूडर्स साधी व सोईस्कर आहेत. या ब्रूडर्सचा उपयोग करून ब्रूडर्स शेडमध्ये सुरवातीस ९५ अंश फॅ. तापमान ठेवावे. पुढील काळात वयोमानानुसार  तापमान कमी करून वातावरणातील तापमानाबरोबर आल्यास कृत्रिम उष्णतेचा स्त्रोत काढून टाकावा.

पिल्ले उष्णतेच्या स्त्रोताखाली एकत्र जमत असतील, तर पुरवली जाणारी उष्णता कमी पडत आहे असे समजावे आणि पिल्ले उष्णतेच्या स्त्रोतापासून दूर जात असतील, तर दिली जाणारी कृत्रिम ऊब जास्त आहे असे समजावे. जर सर्व पिल्लांची उष्णतेच्या स्त्रोताखालील हालचाल समान असेल, तर दिली जाणारी कृत्रिम ऊब योग्य प्रमाणात आहे असे समजावे.

सुरवातीला पिल्लांना पुरेशी जागा मिळणे आवश्यक आहे. विशेषतः उन्हाळ्यात पाण्याची भांडी कमी असल्यास मूतखडा होऊन पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाण वाढण्याची दाट शक्यता असते. पहिल्या





आठवड्यात पिल्लांना खाद्यासाठी लागणारी जागा ही चार सें.मी. प्रति पक्षी असणे, तसेच पाण्यासाठी लागणारी जागा ही १.५ सें.मी. प्रति पक्षी असणे आवश्यक आहे. पहिल्या आठवड्यात पिल्लांसाठी गोलाकार पुठ्ठे किंवा पत्रे लावावेत जेणेकरून पिल्ले उष्णतेच्या स्त्रोतापासून दूर जाणार नाहीत. प्रकाशाच्या तीव्रतेमुळे पक्षी उष्णतेच्या स्त्रोतापासून दूर जाऊन कोपऱ्यात बसतात आणि एकमेकांवर बसल्याने त्यांची मरतुक जास्त प्रमाणात आढळून येते. पिल्ले येण्यापूर्वी पिल्लांच्या शेडचे सर्व पडदे बंद करावेत, जेणेकरून त्या शेडमधील ऊब टिकून राहील. पहिल्या दिवशी पिल्लांना दळलेली मका खाद्य म्हणून द्यावी. त्यानंतर प्रिस्टार्टर खाद्य द्यावे. प्रिस्टार्टर खाद्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने पिल्लांची वाढ झपाट्याने होते व प्रतिकार क्षमता देखील वाढते. सुरवातीच्या काळात साधारणतः पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाण चार ते पाच टक्के असते. व्यवस्थापनातील त्रुटींमुळे हे प्रमाण १० ते १५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. सुरवातीला पिल्ले अतिशय नाजूक असतात, त्यांच्या पायांना जखमा होण्याची शक्यता असते, त्यामुळे पहिले दोन दिवस कागद किंवा रद्दी पेपर जमिनीवर अंथरून त्यावर पिल्लांना वाढवावे. दोन दिवसांनंतर त्यावर वेगवेगळ्या तुसांचा वापर करावा. जसे साळीचा भुसा, लाकडी भुसा, गव्हाचे कांड इ. चा उपयोग करता येतो; परंतु सदरील तूस फार दिवस साठवलेली किंवा ओली नसावी.

काही पिल्लांमध्ये पहिल्या आठवड्यात अनियमित चयापचय प्रक्रियेमुळे मूतखड्याचे व मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढू शकते. हे टाळण्यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात पक्ष्यांना देणे आवश्यक आहे. खाद्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण कमी करून ऊर्जेचे प्रमाण वाढवल्यास फायदेशीर ठरते. व्हिटॅमिन 'ए' पाण्यामधून देणे गरजेचे असते. पिल्लांमध्ये पाण्यामधून रोगाचा प्रसार लवकर होतो. त्यामध्ये ई-कोलाय जंतूमुळे होणाऱ्या रोगास पिल्ले मोठ्या प्रमाणावर बळी पडतात. पिल्लांना सुरवातीपासून पाणी निर्जंतुकीकरण करून देण्यात यावे.

पिल्लांमध्ये सुरुवातीच्या काळात वेगवेगळ्या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी पशुवैद्यकांच्या सल्ल्याने लसीकरण करणे फार महत्त्वाचे आहे. प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे आहे.


✻ मार्गदर्शक ✻

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ संकलन ✻

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

www.mafsu.in www.knpcvs.in

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.